# महाराष्ट्र शासन
## उच्च व तंत्र शिक्षण विभाग
### राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान
### राज्य प्रकल्प संचालनालय (रुसा)

युनिट क्र. २, १८ वा माळा, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर-१,
कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.

ई-मेल- **spdrusamah@gmail.com** | दूरध्वनी क्र.०२२-२२१६०९४३/५९


क्र.राप्रसं/रुसा/आदेश/२०१८-१९/ ३८७ | दिनांक - ०९/०८/२०१९

**कार्यालयीन मंजूरी आदेश**

**विषय :-** राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा २.० ) योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून मंजूर झालेल्या केंद्र व राज्य हिश्याच्या निधी वाटपास मंजूरी देणेबाबत.

**संदर्भ :-** १) मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No.24-37/2014-U.Policy(MHMulti -Gen,SC,ST), दि.१२/०४/२०१९.

२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे शासन निर्णय क्र. रुसायो-२०१८/प्र.क्र. ३४३/विशि-३, दि. १९ जुलै, २०१९.

**प्रस्तावना -**

राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान (रुसा २.० ) अंतर्गत महाराष्ट्र राज्याच्या रुपये ५१९.०० कोटीच्या आराखडयास दि. २५ मे, २०१८; दि. १७ सप्टेंबर, २०१८आणि दि. २४ जानेवारी, २०१९ च्या प्रकल्प मंजूरी मंडळाच्या बैठकीमध्ये मंजूरी मिळालेली आहे. त्यामध्ये भौतिक सुविधा या घटकातंर्गत राज्यातील ३० शासकीय/शासकीय अनुदानित महाविद्यालये यांचा समावेश आहे. उक्त महाविद्यालयांना घटक क्रमांक ९ (Infrastructure Grants to Colleges) अंतर्गत प्रत्येकी रु. २.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने संबंधित महाविद्यालयांनी त्यांच्या कामांचा तपशीलवार प्रकल्प अहवाल(DPR) संचालनालयाला सादर केले आहेत. केंद्र शासनाचा हिस्सा तसेच राज्य हिश्यापोटी उपलब्ध झालेला निधी संदर्भ क्र. २ अन्वये वितरीत करणे प्रस्तावित आहे. त्यानुसार पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश -**

महाविद्यालयांसाठी भौतिक सुविधा निधी (Infrastructure Grants to Colleges) या घटकाअंतर्गत केंद्र शासनाचा हिस्सा रु. ६०.०० लक्ष व राज्य हिस्सा रु. ४०.०० लक्ष असा एकूण रु. ०१.०० कोटी इतका निधी खालील तक्त्यात नमुद केलेल्या महाविद्यालयांना अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | केंद्र हिस्सा (६०%) | राज्य हिस्सा (४०%) | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | Seva Sadan College of Education, Thane | रु. ६०,००,०००/- | रु. ४०,००,०००/- | रु. १,००,००,०००/- |
| २ | Nirmala Niketan College of Home Science, Mumbai | रु. ६०,००,०००/- | रु. ४०,००,०००/- | रु. १,००,००,०००/- |
| ३ | Govt. College of Education, Buldhana | रु. ६०,००,०००/- | रु. ४०,००,०००/- | रु. १,००,००,०००/- |
| ४ | BPCAs College of Physical Education, Wadala, Mumbai | रु. ६०,००,०००/- | रु. ४०,००,०००/- | रु. १,००,००,०००/- |
| ५ | Dayanand Science College, Latur | रु. ६०,००,०००/- | रु. ४०,००,०००/- | रु. १,००,००,०००/- |
| ६ | New Arts, Commerce & Science College, Parner | रु. ६०,००,०००/- | रु. ४०,००,०००/- | रु. १,००,००,०००/- |
| ७ | New Arts, Commerce & Science College, Shevgaon, Ahmednagar | रु. ६०,००,०००/- | रु. ४०,००,०००/- | रु. १,००,००,०००/- |
| ८ | St. Xavier Institute of Education, Mumbai | रु. ६०,००,०००/- | रु. ४०,००,०००/- | रु. १,००,००,०००/- |
| ९ | Loksevak Madhukarrao Chaudhari College of Social Work, Jalgaon | रु. ६०,००,०००/- | रु. ४०,००,०००/- | रु. १,००,००,०००/- |
| १० | Balwant College, Vita | रु. ६०,००,०००/- | रु. ४०,००,०००/- | रु. १,००,००,०००/- |
| ११ | KME Society's G. M. Momin Women College | रु. ६०,००,०००/- | रु. ४०,००,०००/- | रु. १,००,००,०००/- |
| १२ | Mytsyodari Shikshan Santhas Arts, Science and Commerce College Ambad, Jalna | रु. ६०,००,०००/- | रु. ४०,००,०००/- | रु. १,००,००,०००/- |
| १३ | St. Francis De Sales College, Nagpur | रु. ६०,००,०००/- | रु. ४०,००,०००/- | रु. १,००,००,०००/- |
| १४ | Walchand College of Arts & Science, Solapur | रु. ६०,००,०००/- | रु. ४०,००,०००/- | रु. १,००,००,०००/- |
| | **एकूण** | **रु. ८,४०,००,०००/-** | **रु. ५,६०,००,०००/-** | **रु. १४,००,००,०००/-** |

**अटी व शर्ती -**

१) रुसा २.० च्या निधीसाठी राष्ट्रीयकृत बँकेमध्ये स्वतंत्र बचत खाते उघडावे. त्या खात्यामध्ये दुसरा कोणताही व्यवहार करु नये. सदर खाते PFMS या सिस्टमशी लिंक करावे.

२) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत साधनसामुग्री व उपकरणे खरेदी प्रक्रिया सर्व शासकिय महाविद्यालये/ अनुदानित महाविद्यालये/संस्थांनी वित्तीय अधिकार नियम पुस्तिका दि. १७ एप्रिल, २०१५ च्या तरतुदी तसेच शासनाने उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या दि. ०१ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन

निर्णयातील तरतुदीनुसार करावी तसेच अनुदानित महाविद्यालयांनी दि. २४ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयान्वये GEM Portal वरुन संचालनालयाच्या सहाय्याने खरेदी करावी. त्यासाठी महाविद्यालयांनी Consignee आणि Payment Authority चा तपशील संचालनालयास सादर करावा.

३) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान २.० च्या मार्गदर्शक सूचनांनुसार संपूर्ण तपशीलवार प्रकल्प अहवालाच्या एकूण मंजूर रकमेच्या प्रमाणात नवीन बांधकाम, नूतनीकरण व उपकरण खरेदी यांचे प्रमाण अ. ५०:३०:२० ब. ४०:५०:१० क. ४५:४५:१० यापैकी एका प्रमाणात खर्च करणे बंधनकारक आहे.

४) सविस्तर प्रकल्प अहवाला बाहेरील कामांना पुर्व परवानगी शिवाय बदल करता येणार नाहीत.

५) खरेदी, नवीन बांधकाम किंवा नूतनीकरण करण्यात येणाऱ्या बाबीवर राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान ( रुसा ) योजनेचा लोगो तसेच "रुसाच्या सौजन्याने" असे लिहून प्रथम दर्शनी दिसेल अशा स्वरुपात लावणे अनिवार्य आहे.

६) रुसा २.० अंतर्गत वितरित केलेला निधी महाविद्यालयांनी विहित कालावधीमध्ये खर्च पूर्णपणे करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी. महाविद्यालयांना वितरित करण्यात आलेल्या **निधीच्या खर्चाची तसेच कामांची माहिती दर महिन्याच्या पहिल्या आठवडयात, तसेच झालेल्यां खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र(Form १२C या नमुन्यात) दर महिन्याला तपशीलवार खर्चाच्या माहितीसह** या संचालनालयास सादर करावे.

७) महाविद्यालयांनी केलेल्या कामाच्या/खरेदीच्या प्रत्येक टप्प्याच्या खर्चाचे विवरण **Fund Tracking System** मध्ये अपलोड करण्यात यावे.

८) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) अंतर्गत घेण्यात आलेल्या कांमांचे संनियंत्रण खालील नमुद केलेली प्रकल्प सनियंत्रण समिती करेल.

    १) प्राचार्य / संचालक - समितीचे अध्यक्ष
    २) प्राध्यापक प्रतिनिधी
    ३) रुसा समन्वयक
    ४) प्रबंधक - सदस्य सचिव

८) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत प्राप्त निधीचे लेखापरीक्षण(Internal Audit) CAG मान्याताप्राप्त Empanelled सनदी लेखापाल यांचेकडून करुन अहवालाची प्रत दि. ३० जून, २०२० पर्यंत राज्य प्रकल्प संचालनालयास पाठविण्यात यावी. तसेच त्यासाठी रोख वही (Cash Book) स्वतंत्रपणे ठेवण्यात यावी.

९) शासकीय महाविद्यालयांनी /अनुदानित महाविद्यालयांनी रुसा योजने संदर्भातील सर्व कागदपत्रे, लेखापरिक्षण, महालेखापाल, महाराष्ट्र - १ किंवा प्रकरणपरत्वे महाराष्ट्र- २ नागपूर यांनी सदर कामाकरीता प्राधिकृत

केलेले अधिकारी यांना तपासण्याचे अधिकार असून, त्यांनी मागणी केल्यास सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे तपासणीकरीता उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

१०) महाविद्यालयांनी रुसा योजने संदर्भातील सर्व कागदपत्रे, लेखापरीक्षण अहवाल इ. या संचालनालयाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांना तपासणीस उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

**११) महाविद्यालयांनी पुरवठादारास/ कंत्राटदारास अदा करावयाची देयकाची रक्कम PFMS द्वारे त्यांच्या बँक खात्यात वर्ग करावी. रोखीने व्यवहार करु नये.**

१२) या आदेशान्वये प्रत्येकी रुपये ०१.०० कोटी इतका निधी PFMS द्वारे महाविद्यालये / संस्थाच्या रुसा अनुदानासाठी उघडलेल्या स्वतंत्र बचत बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात येत आहे.

१३) महाविद्यालयांनी नवीन बांधकाम/ नुतनीकरणाचे काम **Energy Conservation Building Code २०१७, Bureau of Energy Efficiency, Ministry of Power, Government of India** मार्गदर्शक तत्वानुसार पार पाडावे.

१४) महाविद्यालयाने रुसा अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या सोयी सुविधा, पुस्तके, उपकरणे नजदीकच्या महाविद्यालयांसाठी उपलब्ध करुन देण्यात यावेत.

१५) महाविद्यालयांनी खरेदी केलेले उपकरणे लवकरात लवकर स्थापित करुन ती विद्यार्थ्यांच्या वापरासाठी खुली करावीत.

१६) महाविद्यालयांनी पुरवठा आदेशानुसारच खरेदी झाली आहे काय याची खात्री करावी.

१७) महाविद्यालयांनी खरेदी करताना निविदा संकेतस्थळ व वर्तमानपत्रे यामध्ये प्रसिध्द करावी.

१८) महाविद्यालयांनी खरेदी कलेल्या उपकरणांची जड वस्तू संग्रह नोंदवहीत (Serial Number wise) नोंद घ्यावी.

१९) पुर्व परवानगीशिवाय सविस्तर प्रकल्प अहवालाबाहेरील करण्यात आलेला खर्च अनुज्ञेय असणार नाही.

२०) महाविद्यालयांनी रुसा निधी अंतर्गत करण्यात आलेल्या कामांची तसेच उपक्रमांची माहिती शिक्षक तसेच विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

९/८

राज्य प्रकल्प सहसंचालक
राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान (रुसा)

State Project Joint Director
State Project Directorate
Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan
Mumbai

प्रति-

१. प्राचार्य/संचालक, संबंधीत महाविद्यालये.
२. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३. उपसंचालक (वित्त), राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान
४. निवड नस्ती (रुसा)